# अचानक

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B 288

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अचानक : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण' प्लॉट नं.-१७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन-०२३१-२६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- २००९, दुसरी आवृत्ती- २०११,
तिसरी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# अचानक

मैत्रीचं नातं ! सुंदर ! अतूट ! अनोखं !
या नात्याने आमचे कुटुंबिय झालेले
डॉ. अरुण कुलकर्णी व नृत्यविशारद असणारी,
स्वत:च्या हास्याने चांदणे फुलवणारी माझी
मैत्रीण सौ. सीमा अ. कुलकर्णी या स्नेही उभयतांना
सस्नेह भेट...

**– सौ. शोभा सतीश राऊत**

## मनोगत

'अचानक' ही माझी सातवी कादंबरी वाचकांच्या हातात देताना मला खूप आनंद होत आहे. यापूर्वीच्या कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. माझ्या लिखाणावर खूप प्रेम केले. अनेकांनी पत्र पाठवून आपला अभिप्राय कळविला आहे. माझ्या या नवीन कादंबरीवर रसिक वाचक उदंड प्रेम करतील. त्यांना 'अचानक' कादंबरी आवडेल, ही माझी अपेक्षा आहे.

या कादंबरीला 'अचानक' हे नाव देण्यामागे कारणही तसेच आहे. या कादंबरीची कल्पनाही मला अगदी अचानकपणे रात्री दोन वाजता सुचली. त्यावर आणखीन विचार केल्यावर लक्षात आले ह्या कल्पनेवर कादंबरी होऊ शकते. दुसरे कारण त्यातील घटना अशाच अचानक घडत जातात आणि अशा अचानक घडलेल्या घटनांवरून ही कादंबरी रंगत जाते.

**– सौ. शोभा सतिश राऊत**

# १

''आई, आजी, अगं काय होतंय तुला? असे काय करतेस?'' वरदा खूप घाबरली होती. सरस्वतीबाईंना त्रास होत होता. त्या काही बोलण्याच्या स्थितीत नव्हत्या.

''काकू, अहो काकूऽऽ'' वरदाने हाक मारली.

विमलाबाई हात पुसत आल्या, ''काय पाहिजेल वरदाताई?''

''अहो, बघा ना आई - आजीला काय झालेय.''

''अगं बाई... फिट आलीय त्यांना.''

''फिऽऽ छे! आई - आजीला कधी फिटबीट आलेली नाही. तुम्ही आधी डॉक्टरांना फोन करून बोलवा.''

''हो, मला तर काही सुचेना झाले आहे.''

वरदाने डॉक्टरांना फोन केला.

''डॉक्टर अंकल, मी वरदा बोलते आहे, तुम्ही लवकर या, आई-आजीला काहीतरी होतंय, प्लीज लवकर या.''

''वरू तू घाबरून जाऊ नकोस, मी निघतोय.''

वरदा सरस्वतीबाईंजवळ आली. सरस्वतीबाईंचा चेहरा वेदनेने पिळवटून गेलेला होता. अंगाला घाम सुटला होता. वरदा त्यांचा घाम पुसू लागली.

''काकू, आई - आजीला असे अचानक काय झाले असेल हो? मघाशी तर ती अगदी चांगली होती.''

विमलाबाई काय बोलणार. त्यांना तरी कुठे काय समजत होते, त्याही वरदासारख्या घाबरून गेल्या होत्या. बऱ्याच वर्षांपासून त्या या घरात कामाला होत्या, आता घरच्याच झाल्या होत्या.

डॉ. देशपांडे आले, त्यांनी सरस्वतीबाईंना तपासले. ''वरू, यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागेल.

''डॉक्टर अंकल, काय झाले आहे आई - आजीला?''

''घाबरण्यासारखे काही नाही. तू त्यांचे कपडे वगैरे पॅक कर. मी फोन करून ॲम्ब्युलन्स बोलावतो.''

काकूंनी पटापट कपडे पॅक केले. वरदाला काही सुचत नव्हते. थोड्याच वेळात गाडी आली.

हॉस्पिटलमध्ये सरस्वतीबाईंना तपासणीसाठी आत नेले होते. वरदा एकटी बाहेर बसली होती. चिंताक्रांत झालेली! घाबरलेली! बावरलेली! असाहाय्य वरदा! तिची आई - आजी म्हणजे तिचा जीव की प्राण! आई - आजी म्हणजे वरदाचे सर्वस्व!

वरदा तिच्या आजीला आई - आजी म्हणायची आणि त्याचं अप्रुप वाटायचं सर्वांना. वरदाच्या आई-वडिलांचा अपघाती मृत्यू झाला होता. चार-साडेचार वर्षांची आणि तिचा भाऊ वरुण होता सात वर्षांचा. वरदाला, वेळी, अवेळी आईची आठवण यायची, तरी रडू लागायची. तिला त्यावेळी पाहिजे असायची आई, फक्त आई! आणि ते देणं कोणाच्या हाती नव्हतं. असेच एकदा सरस्वतीबाई तिला समजावीत होत्या, ''आजपासून मी तुझी आई.''

''नाहीच मुळी, तू माझी आजी आहेस.''

''होय, आणि आईसद्धा. आपण किनई खूप मज्जा करायची. खेळायचं, आइस्क्रीम आवडते ना तुला- मी रोज तुला आईस्क्रीम देणार पण असे रडायचे नाही सारखे सारखे.''

''आजी, मी तुला आई म्हणू?''

''म्हण की! मला आवडेल.''

''पण तू तर आजी आहेस ना?''

''मग मी आई-आजी..''



''अय्या! आई-आजी छान, मी तुला आई-आजीच म्हणणार.'' तेव्हापासून वरदा सरस्वतीबाईंना आई-आजी म्हण लागली. सरस्वतीबाई दोन्ही मुलांना जपत होत्या, मायेने न्हाऊ घालत होत्या. त्यांच्या 'वसंताची मुले' त्यांचा जीव की प्राण होती. अचानक आलेल्या पर्वतासारख्या दुःखाला त्या सामोऱ्या गेल्या. आपलं दुःख काळजाच्या कुपीत ठेवून त्या नातवांसाठी जगू लागल्या. एकट्या, एकाकी असलेल्या सरस्वतीबाईंनी विधात्याला साक्षी मानून नातवांचे जीवन घडवण्यात स्वतःला त्यांनी वाहून घेतले. त्यांच्या पतीने, मुलाने, सुनेने, जीवनाच्या प्रवाहात त्यांना एकटे सोडले होते. पण आपल्या या दोन्ही नातवांना आपण वाऱ्यावर सोडायचे नाही. त्यांना योग्य प्रकारे उभे करायचे. त्या देवाला प्रार्थना करीत, ''माझ्या या नातवांचे सर्वकाही व्यवस्थित होऊ देत. त्यांचे भरले संसार पाहूनच तू माझे डोळे मीट.''

देवानेही आजपर्यंत त्यांची प्रार्थना ऐकली होती, वरुण केमिकल इंजिनीअर झाला होता. मध्य प्रदेशातील एका मोठ्या कंपनीत चांगल्या पदावर तो काम करीत होता. त्याच्या पसंतीच्या मुलीबरोबर सरस्वतीबाईंनी त्याचे लग्न करून दिले होते. वरुणच्या बाबतीत त्या निर्धास्त झाल्या होत्या. आता एकच काळजी होती त्यांना वरदाची. वरदा आर्किटेक्चरच्या शेवटच्या वर्षाला होती. एवढे वर्ष संपले की या वरदासाठी छानसा मुलगा बघून तिचे लग्न करायचे हे स्वप्न त्या बघत होत्या.

वरदा अस्वस्थपणे बसली होती डॉक्टरांच्या प्रतीक्षेत; पण याक्षणी आता तिला खूप एकटे वाटू लागले. कोणीतरी आपल्या सोबतीला पाहिजेच पाहिजे. ती चटकन उठली. तिला सुनीलकाकांची आठवण आली. सुनीलकाका म्हणजे तसे मानलेलेच काका होते. बऱ्याच वर्षांपासून दोन्ही घरांत घरोबा होता. वरदाने रिसेप्शनिस्टला विनंती करून सुनीलकाकांना फोन लावला.

''सुनीलकाका, मी वरदा. हॉस्पिटलमधून बोलतेय. आई-आजीला अचानक त्रास सुरू झाला आहे म्हणून तिला डॉ. देशपांडेंच्या दवाखान्यात आणले आहे. तुम्ही लवकर या.''

''वरू, तू घाबरू नकोस, मी येतोच थोड्या वेळात.''

सुनीलकाका येणार म्हटल्यावर वरदाला मनोमन बरे वाटले. बोलल्याप्रमाणे सुनील दहा मिनिटांत आला.